## रिटेल फायनान्स :-

**नविन दुचाकी/चारचाकी वाहन खरेदी**

**(२) सामान्य ग्राहक/ठेवीदार व वाहन व्यावसायिकासाठी -**

**कर्जमर्यादा -** एकूण कोटेशनच्या ८०% जास्तीत जास्त रु.५.०० लाख

**मुदत-** ७ वर्षे (मासिक हप्ता),

**व्याजदर -** १३.००(ज्या त्या वेळच्या धोरणानुसार व्याजदर राहील)

**कर्जदार पात्रता -**

१) अर्जदार हा सांगली जिल्हयातील रहिवाशी असणे आवश्यक.

२) अर्जदार व जामिनदार बँकेचा ब वर्ग सभासद असणे आवश्यक.

३) दोन जामिनदार त्यापैकी एक नोकरदार (शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था यामधील) व दुसरा आयकर विवरणपत्र धारक व्यावसायिक.

४) अर्जदाराचे किंवा कुटुंबातील व्यक्तींचे नावावरील कर्जमागणी रक्कमेइतपत मुल्यांकनाची निर्वेध मालमत्ता (घर/जमिन/जागा )

५) अर्जदार व जामिनदाराची वयोमर्यादा १८ ते ५५ वर्षापर्यंत असणे आवश्यक.

६) अर्जदाराचे बँकेमध्ये किमान ६ महिन्यापेक्षा जादा कालावधीचे बचत ठेव (सेव्हिंग्ज) खाते असले पाहिजे. व त्यावर समाधानकारक उलाढाल असली पाहिजे.

**तारण :-**

१) कर्जातून घेतलेली नवीन दुचाकी/चार चाकी वाहन हे बँकेस हायपोथिकेशनद्वारे तारण राहील.

२) याशिवाय कर्जदाराचे किंवा कुटुंबातील व्यक्तींचे नावावरील कर्ज मंजूर रक्कमेइतपत मुल्याची निर्वेध मालमत्ता (घर/जमिन/जागा) रजि.मॉर्गेज डीडने तारण देणे आवश्यक.

३) कर्ज मंजूर मर्यादेमधून ५% रक्कम ठेवीमध्ये गुंतवणूक करणेची असून सदरची ठेव कर्जास सहतारण राहील.